## सहवेदना

### अंजूबाई पाटील

**आळते :** पाडळी येथील अंजूबाई यादवराव पाटील (१०३) यांचे



निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन गुरुवारी तीन ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० वा. पाडळी येथे होणार आहे.

### मारुती पाटील

**ऐतवडे बुद्रुक :** वाळवा तालुक्यातील लाडेगाव येथील



मारुती भाऊ पाटील (९६) यांचे निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन बुधवारी सकाळी साडेनऊ वाजता लाडेगाव येथे होणार आहे.

# नागरी सुविधा द्या, अन्यथा मतदानावर बहिष्कार

## कुपवाड मनपावर समस्याग्रस्त नागरिकांचा मोर्चा : प्रशासन-नगरसेवकांविरोधात जोरदार निदर्शने

प्रतिनिधी
कुपवाड

कुपवाडच्या प्रभाग समिती तीन अंर्तगत येणाऱ्या प्रभाग दोनमधील विस्तारित सावळी-मिरज रस्त्या लगतच्या हनुमाननगर भागातील समस्याग्रस्त संतप्त नागरिकांनी मंगळवारी रस्ते दुरुस्ती, दिवाबत्ती, गटारीसह नागरी सुविधांच्या मागणीसाठी येथील मनपा कार्यालयावर मोर्चा काढला.

आमच्या विस्तारित भागाकडे कोणतेही नगरसेवक फिरकत नाहीत, फोन उचलत नाहीत, मनपा प्रशासनही दाद देत नाही. मग समस्या मांडायच्या कोणाकडे? भरमसाठ कर आकारता, मग सुविधा का देत नाही? असा संतप्त सवाल व्यक्त करून आम्हाला तात्काळ मूलभूत नागरी व आरोग्य सुविधा द्या. अन्यथा, फसवी आश्वासने देणाऱ्या कोणत्याही नगरसेवकांना भागात फिरू देणार नाही. शिवाय येत्या सर्व निवडणुकांमध्ये मतदानावर बहिष्कार टाकू, असा इशारा यावेळी आंदोलकांनी दिला. यावेळी समस्यांग्रस्त नागरिकांनी मनपा कार्यालयासमोर प्रशासन आणि नगरसेवकांविरोधात तीव्र शब्दात जोरदार निदर्शने केली. मात्र, आंदोलकांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी जबाबदार अधिकारी जाग्यावर नव्हते. त्यामुळे बांधकाम विभागाचे अधिकारी अशोक कुंभार यांनी रस्त्यावर तात्काळ मुरुम टाकतो, असे आश्वासन देवून वेळ मारून नेली आणि आंदोलकांना शांत केले. कुपवाडच्या प्रभाग क्रमांक दोनमध्ये सावळी-मिरज रस्त्यालगत हनुमाननगरचा विस्तारित भाग आहे. या भागात मनपाच्या स्थापनेपासून रस्ते, दिवाबत्तीसह अद्याप मूलभूत नागरी सुविधा मिळाल्या नाहीत. महापालिका प्रशासनाकडे नागरी सुविधा पुरविण्यासाठी वारंवार लेखी व तोंडी मागणी केली. तरीही महापालिका प्रशासन आणि स्थानिक नगरसेवक या भागातील समस्याकडे डोळेझाक करीत आहेत, त्यांच्या मागणीला केराची टोपली दाखविली जाते, असा नागरिकांचा आरोप आहे. गतवेळच्या आंदोलनावेळी आयुक्तांनी प्रशासनाला पाहणी करून कामाबाबत तातडीने प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतू, या भागात प्रशासन फिरकलेच नाही. तशातच भागात जोराचा पाऊस पडल्याने चिखलमय व खराब रस्त्यांमुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल सुरु आहेत.

दिवाबत्तीचीही सोय नाही. त्यामुळे येथील त्रस्त नागरिक व महिलांनी मंगळवारी प्रभाग समिती तीनच्या कार्यालयावर मोर्चा काढला.

यावेळी नगरसेवक गजानन मगदूम व शेडजी मोहीते यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन तातडीने भागात मुरमीकरण करण्याची तसेच प्रलंबित सुविधा पुरविण्याची ग्वाही दिली. आंदोलनात दीपक चव्हाण, विलास बोरलिक, मारुती माने, विजय माळी, विजय आठवले, अजित हासूरकर, सुमन कोरे, आकूबाई मोहिते, सुवर्णा मादगुळ, गणेश भोसले, विशाल खांडेकर यांसह असंख्य महिला व पुरूष सहभागी झाले होते.



**कुपवाड : नागरी सुविधांच्या मागणीसाठी येथील मनपा कार्यालयासमोर प्रशासन व नगरसेवकांविरोधात निदर्शने करताना आंदोलक.**

## बाजार समितीकडून चाराडेपोची मागणी



**आटपाडी : चाराडेपोसाठी तहसीलदार बी. एस. माने यांना निवेदन देताना सभापती संतोष पुजारी, उपसभापती राहूल गायकवाड व अन्य.**

प्रतिनिधी
आटपाडी

आटपाडी तालुक्यात समाधानकारक पाऊस नसल्याने पशूधनाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शासनाने तालुक्यातील पशूधनाची संख्या विचारात घेवून तात्काळ चाराडेपो सुरू करावी, अशी मागणी बाजार समितीने केली आहे.

आटपाडी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संतोष पुजारी, उपसभापती राहूल गायकवाड, संचालक भगवान पाटील, सुनिल तळे, मंगेश सस्ते, सचिव शशिकांत जाधव यांनी तहसीलदार बी. एस. माने यांची भेट घेत निवेदन दिले. आटपाडी तालुक्यात मान्सूनपूर्व पाऊस नेहमी असतो. परंतू यावर्षी हा पाऊस पडला नाही. परिणामी तालुक्यात फक्त १३ टक्के इतक्याच खरीपाच्या पेरण्या झाल्या. गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्यांसह लहान-मोठी जनावरांची संख्या सुमारे ३ लाख ८२हजार ३१० इतके पशूधन आहे.

परंतू या पशूधनाला चारा उपलब्ध नाही. त्यामुळे चाऱ्यासाठी पशुपालकांची धावधाव होत आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ चारा डेपो सुरू करून पशूधन वाचविण्यासाठी योगदान द्यावे, अशी मागणी सभापती संतोष पुजारी यांनी केली. शिवाय पाऊस नसल्याने पेरणी झालेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई शासनाने द्यावी, अशी मागणी केली आहे.

## सुभाषनगरमध्ये मटका अड्ड्यावर कारवाई

**मिरज :** तालुक्यातील सुभाषनगर येथे सुरु असलेल्या मटका अड्ड्यावर मिरज ग्रामीण पोलिसांनी कारवाई केली. याप्रकरणी संशयित शंकर आप्पासोा नाईक (३२, रा. साईनाथनगर, तासगाव फाटा, मिरज) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून ११ हजार, ७२८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सुभाषनगर येथे एका पानटपरीच्या आडोशास बसून शंकर नाईक हा मुंबई मटका घेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तेथे कारवाई केला असता, संशयित नाईक हा मटक्याची आकडे लिहित असताना मिळून आला. पोलिसांनी त्याला पकडले. त्याच्याकडून मटक्याचे साहित्य, रक्कम असा ११ हजार, ७२८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी मिरज ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बेळंकी येथून दुचाकी चोरीस

**मिरज :** तालुक्यातील बेळंकी येथे घरासमोर लॉक करुन लावलेली सुमारे दहा हजाराची दुचाकी चोरट्यांनी चोरुन नेली. तशी तक्रार अनिल तातोबा आरगे (३०) यांनी मिरज ग्रामीण पोलिसात दिली आहे.

आरगे यांनी रात्रीच्या सुमारास आपल्या घरासमोर स्प्लेंडर प्लस कंपनीची मोटारसायकल (केए-२३-ईटी-४७७४) दुचाकी लॉक करुन लावली होती.

अज्ञात चोरट्यांनी सदर दुचाकी लॉक तोडून चोरुन नेली. आरगे यांनी सकाळी सर्वत्र शोध घेतला. मात्र, दुचाकी सापडली नाही. याबाबत त्यांनी ग्रामीण पोलिसात तक्रार दिली आहे.

## आत्महत्त्येचा प्रयत्न करणाऱ्या 'त्या' दाम्पत्याची प्रकृती स्थिर

**विटा :** फेसबूक लाईव्ह करून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या कांबळे दाम्पत्याची प्रकृती स्थिर आहे. आता त्यांना २४ तास निरीक्षणाखाली ठेवले आहे, अशी माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली.

विट्यातील फुलेनगर मधील प्रशांत आणि स्वाती कांबळे हे दाम्पत्य त्यांच्या दोन मुलांसह राहतात. या घरासाठी रस्ता मिळावा, यासाठी त्यांचा लढा सुरू आहे. याच प्रश्नी काही महिन्यांपूर्वी त्यांनी संपूर्ण कुटुंबासह उपोषण केले होते. याबाबत विट्याच्या तहसीलदारांकडे खटला सुरू होता. मात्र प्रशांत कांबळे यांनी पत्नी स्वातीसह काल सोमवारी दुपारी फेसबूक लाईव्ह करत तहसील प्रशासनावर आरोप करत अन्नातून विषारी औषध घेतले. त्यानंतर प्रशांतचे वडील प्रल्हाद कांबळे यांनी त्या दोघांनाही येथील एका खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. याबाबत संबंधित रूग्णालयाचे डॉ. भरत देवकर यांनी कांबळे दाम्पत्याची प्रकृती आता स्थिर असून पुढच्या २४ तासांसाठी त्यांना निरीक्षणाखाली ठेवण्यात आल्याचे सांगितले.

आज मंगळवारी सायंकाळी राजेंद्र खरात यांनी संबंधित कांबळे परिवाराची भेट घेतली. त्यांनी याप्रकरणी कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी केली आहे.

याबाबत तहसीलदार उदयसिंह गायकवाड यांनी सध्या आपण पुण्यात असून घरासाठी रस्त्याचा विषय हा तहसील प्रशासनाअंतर्गत येत नाही, असे सांगितले. कांबळे दाम्पत्यावर अद्यापही उपचार सुरू असून ते सुखरूप बाहेर आल्यानंतर त्यांचे जबाब घेण्यात येतील, अशी माहिती निरीक्षक डोके यांनी दिली.

# येडेनिपाणी व मल्लिकार्जून डोंगराचा फेर सर्व्हे

## पेरीव क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी बैठकीत निर्णय : माजी मंत्री शिवाजीराव नाईक यांची माहिती

वार्ताहर
शिराळा

वाकुर्डे उपसा जलसिंचन योजनेच्या भाग क्रमांक दोनमधून येडेनिपाणी व मल्लिकार्जून डोंगराच्या दोन्ही बाजूचे पेरीव क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी येथील क्षेत्राचा फेर सर्व्हे करून हे क्षेत्र वाकुर्डे योजनेत समाविष्ट करून घेण्याबाबतच्या महत्वपूर्ण सूचना कोल्हापूर पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता अभिजित म्हेत्रे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याची माहिती शिवाजीराव नाईकांनी दिली.

कोल्हापूर येथील सिंचन भवन मध्ये वाकुर्डे उपसा जलसिंचन योजनेच्या भाग क्र. २ मधील वाळवा तालुक्यातील पाण्यापासून वंचित असणारे क्षेत्र या योजनेत समाविष्ट करणे बाबत व्यापक बैठक झाली.

याबाबत माहिती देताना शिवाजीराव नाईक म्हणाले, या परिसरातील शेतकऱ्यांनी आमच्याकडे केलेल्या मागणीनुसार बैठक झाली. वाकुर्डे उपसा जलसिंचन योजनेच्या भाग क्र. २ मधून वाळवा तालुक्यातील पाण्यापासून वंचित असणारे क्षेत्र ओलिताखाली आणण्याच्या योजनेस शासनाची मान्यता मिळाली आहे. वारणा डावा कॅनॉलमधून लादेवाडी नजीकच्या पंप हाऊस येथून पाणी उचलून ते बंद पाईप लाईनने वाळवा तालुक्यातील येडेनिपाणी, गोटखिंडी, बावची ते आष्ट्यापर्यंत जाणार आहे. तसेच दुसरी पाईप लाईन येलूर, मालेवाडी, बहादूरवाडी, भडकंबे, नागाव, पोखर्णी या गावच्या शिवारातून आष्ट्याच्या शिवारापर्यंत जाणार आहे.





**शिराळा : येडेनिपाणी मल्लिकार्जून येथील पाण्यापासून वंचित क्षेत्राला वाकुर्डे योजनेतून पाणी देण्याकरिता व्यापक बैठक झाली. यावेळी माजी राज्यमंत्री शिवाजीराव नाईक, अधीक्षक अभियंता अभिजीत म्हेत्रे व इतर.**

येडेनिपाणी येथील मल्लिकार्जून डोंगर लाईनच्या दोन्ही बाजूचे क्षेत्राला पाणी देण्यासाठी वाकुर्डे योजनेच्या भाग क्र. दोनला विशेष बाब म्हणून शासनाकडून मान्यता मिळाली आहे. म्हणून सदर भाग क्र. दोनचे काम प्रस्तावित करीत असताना लिफ्ट हेड वाढवून डोंगर लाईनच्या दोन्ही बाजूंनी बंद पाईप लाईनचे काम करावे, असे आम्ही सूचवले होते. त्यास अधीक्षक अभियंता यांनी हिरवा कंदील दाखवला आहे.

त्यानुसार येथील अधीक्षक अभियंता यांनी वंचित असणारे क्षेत्र योजनेत समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने फेर सर्व्हेच्या सूचना अधिकाऱ्यांना बैठकीत दिल्या. यावेळी सुखदेव पाटील, रणधीर नाईक, सी. एच. पाटील, डॉ. सचिन पाटील, दिलीप पाटील, एस. आर. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## नांद्रेत मध्यरात्री वन्यप्राण्याचा हल्ला

**नांद्रे :** नांद्रे (ता. मिरज) येथील शरद पाटील नगरमधील आदम हाजीनिजाम मुल्ला या शेतकऱ्याचा शेळीपालनचा व्यवसाय आहे. मध्यरात्री वन्यप्राण्याने हल्ला करत दोन शेळ्या ठार मारून एक बोकड पळवून नेले आहे.

सकाळी आदम मुल्ला हे शेळ्यानां वैरण टाकण्याकरिता गेले असता त्यांच्या हा प्रकार लक्षात आला. हे काम बिंबट्याचेच केले असावे, अशी घटनास्थळी चर्चा रंगली होती. याबाबत महेबूब मुल्ला, तलाठी स्वप्निल शिंदे, पोलीस पाटील सौ. स्वाती वंजाळे यांनी तात्काळ सांगली वनविभागाशी दूरध्वनीवरून संपर्क करून माहिती दिली.

यावेळी बोलताना आदम मुल्ला म्हणाले, माझ्या शेळीपालन व्यवसायातील या हल्ल्यात दोन शेळ्या ठार झाल्या आसून एक बोकड गायब झाले आहे. माझे ६० हजाराचे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी मला माझे झालेले आर्थिक नुकसान शासनाने तात्काळ द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## बेडगप्रकरणी सखोल चौकशीची मागणी

**सांगली :** मिरज तालुक्यातील बेडग येथील कमान पाडल्याची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्यासह इतर दोषीवर कायदेशीर कारवाई करा, अशी मागणी ग्रामस्थांनी चौकशी समितीकडे केली. यावेळी कमानीचे डिझाईन समितीसमोर दाखवण्यात आले.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल ओसवाल यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने बेडग प्रकरणातील एका गटाच्या ग्रामस्थांचे म्हणणे शुक्रवारी ऐकून घेतले. यावेळी दुसऱ्या गटाने बहिष्कार टाकला होता. दुसऱ्या गटाने मंगळवारी जिल्हा परिषदेच्या सभागृहात आपले म्हणणे सादर केले. २००२ पासून कमान बांधण्यासाठी संघर्ष सुरू आहे. कमान पाडल्याने अनेकांच्या भावना दुखावल्या आहेत. कमान कोणी पाडली हे नेमक समजत नाही. प्रशासन एकमेकांकडे बोट दाखवत आहे. त्यामुळे कमान नेमकी कोणी पाडली, हे जाहीर करावे. तसेच लवकरात लवकर कमान उभी करावी. अन्यथा पुन्हा लाँग मार्च अथवा आंदोलन करण्यात येईल. तसेच कमान पाडण्यासाठी जे काणी दोषी असेल त्या प्रत्येकावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी जिपच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे, बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता भारती बिराजे, उपविभागीय पोलिस अधिवकारी प्रणिल गिल्डा, तहसीलदार डॉ. अपर्णा मोरे-धुमाळ, गटविकास अधिकारी संध्या जगताप उपस्थित होते. आणखी ग्रामस्थांचे म्हणणे जाणून घेण्यासाठी समितीचे सदस्य बेडग येथे जाणार आहेत. या प्रकरणातील दोन्ही बाजूच्या ग्रामस्थांची ते बोलणार आहे. त्यानंतर अंतिम अहवाल करून सीईओ धोडमिसे यांच्याकडे सादर करणार आहेत.

## तीन तोळ्याचे मंगळसूत्र पळविले

**सांगली :** येथील सुजाता खराडे या माहेरी मणेराजुरी येथे आल्या होत्या. रविवारी सासरी जाण्यासाठी त्या सांगली बसस्थानकावर आल्या. त्या कुरुंदवाडकडे जाणाऱ्या बसमध्ये बसण्यासाठी पुढे सरसावल्या. त्या ठिकाणी झालेल्या गर्दीचा फायदा घेत चोरट्याने खराडे यांनी खांद्याला लावलेल्या पर्सची चेन उघडून आतील छोट्या कप्प्यात ठेवलेले तब्बल तीन तोळे सोन्याचे मंगळसूत्र चोरुन नेले.

बसमध्ये बसल्यानंतर आपला ऐवज चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी शहर पोलिसांत धाव घेऊन घडलेल्या घटनेची फिर्याद दिली. पोलिसांनी खराडे यांचा ४५ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याची नोंद केली करण्यात आलेली आहे.

## कारखान्यासमोर एसटीवर दगडफेक

**सांगली :** सांगली-माधवनगर दरम्यानच्या रस्त्यावर वसंतदादा साखर कारखान्यासमोर एकाने एसटीवर एकाने दगडफेक केली. याप्रकरणी एसटीचालक कृष्णा विठ्ठल करांडे (रा. करगणी, ता.आटपाडी) यांनी संजयनगर पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी संशयित राजा दऱ्याप्पा यादव (रा. चिंतामणीनगर) याच्या विरोधात गुन्हा दाखल आहे.

फिर्यादी करांडे हे एसटी घेऊन सांगलीकडे येत होते. त्यावेळी साखर पेट्रोल पंपासमोर संशयित राजा यादव याने एसटीच्या समोरच्या काचेवर दगडफेक केली. त्याने एसटीमधील प्रवाशांच्या जीविताला धोका निर्माण करण्याचे कृत्य केले. त्याचबरोबर एसटीचे सुमारे पाच हजार रुपयांचे नुकसान केल्याची फिर्याद करांडे यांनी दिली आहे.

## 'तासगावातील अवैध धंदे बंद करा'

**तासगाव :** शहरासह तालुक्यात प्रचंड प्रमाणात गांजा विक्री सुरू असून यामुळे तरुण पिढी बरबाद होत आहे. त्यामुळे गांजा विक्री, नशेची पावडर यांची विक्री व अवैध धंदे बंद करण्यात यावेत, अशी मागणी तासगाव तालुका काँग्रेस कमिटीतर्फे निवेदनाद्वारे केली आहे.

याप्रकरणी तासगाव पोलीस ठाणेत तासगाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महादेव नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले आहे. यामध्ये म्हटले आहे की, तासगाव शहरात व तालुक्यात प्रचंड मोठ्या प्रमाणात गांजाची विक्री होत आहे त्याचबरोबर नशेच्या पावडरचा ही वापर तरुण पिढी नशा पानासाठी मोठ्या प्रमाणात करत आहे. शहरात नऊ ते दहा ठिकाणी गांजाची विक्री होता असून २० ते २५ किलो पेक्षा जास्त गांजा विक्री दररोज होत असल्याचे समजते.

शहरासह तालुक्यातील सर्व दोन नंबरचे धंदे तातडीने बंद करून त्यावर ती योग्य ती कारवाई करण्यात यावी, येत्या पंधरा दिवसात याप्रकरणी कारवाई झाली नाही तर नाईलाजास्तव आंदोलन करतील, असा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.


आमचे प्रेरणास्थान



माजी. आम. कै. मोहनरावजी शिंदे म्हैसाळकर

म्हैसाळ गावचे थोर सुपुत्र आमच्या संस्थेचे संस्थापक, मार्गदर्शक माजी आमदार
**कै. मोहनरावजी शिंदे - म्हैसाळकर (बाबा)**
यांच्या जयंतीदीनी त्यांच्या स्मृतीस आमचे
**विनम्र अभिवादन**

- श्रीमंत श्रीमती पद्मीनीदेवी मोहनराव शिंदे-म्हैसाळकर - चेअरमन
- नरसिंह संगलगे - व्हा. चेअरमन
- सतिश पाटील - सेक्रेटरी
- श्रीपाल माळी - कॅशिअर व हेड क्लार्क

सर्व संचालक, सभासद व कर्मचारी वृंद


**आबासाहेब शिंदे सर्व सेवा सहकारी सोसायटी लि., म्हैसाळ, ता. मिरज.**

विनम्र **अभिवादन**

म्हैसाळ गावचे थोर सुपुत्र, आमच्या संस्थेचे संस्थापक, मार्गदर्शक माजी आमदार कै. मोहनरावजी शिंदे - म्हैसाळकर (बाबा) यांच्या जयंतीदीनी त्यांच्या स्मृतीस आमचे **विनम्र अभिवादन..!**

- सौ. मनोरमादेवी मनोज शिंदे-म्हैसाळकर - चेअरमन
- सौ. राजश्री बापू खोत - व्हा. चेअरमन
- निवास शेजवळकर- सेक्रेटरी

सर्व संचालिका, सभासद व कर्मचारी वृंद



माजी. आम. कै. मोहनरावजी शिंदे म्हैसाळकर

**कुमुदिनी महिला ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., म्हैसाळ, ता. मिरज.**



माजी. आम. कै. मोहनरावजी शिंदे म्हैसाळकर

विनम्र **अभिवादन**


म्हैसाळ गावचे थोर सुपुत्र, आमच्या संस्थेचे संस्थापक, मार्गदर्शक माजी आमदार कै. मोहनरावजी शिंदे - म्हैसाळकर (बाबा) यांच्या जयंतीदीनी त्यांच्या स्मृतीस आमचे **विनम्र अभिवादन..!**

- श्रीमंत मनोज मोहनराव शिंदे-म्हैसाळकर - चेअरमन
- आर.के.पाटील - व्हा. चेअरमन
- अरूण रामचंद्र साळुंखे - सेक्रेटरी

सर्व संचालिका, सभासद व कर्मचारी वृंद

**मा. मोहनराव शिंदे ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., म्हैसाळ, ता. मिरज**

॥ ऋणनिर्देश ॥



स्व. सिताराम आनंदा माने (नाना)

आमचे सर्वांचे आधार स्व.श्री सिताराम आनंदा माने (नाना) यांचे दि. २०/७/२०२३ (वय ९०) रोजी वृध्दापकाळाने आकस्मित निधन झाले. आमच्या कुटूंबावरती दुःखाचा डोंगर कोसळला, या संकटसमयी आम्हाला धीर देण्यास, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, व्यवसायिक, धार्मिक शैक्षणिक तसेच विविध संस्था, मंडळ जेष्ठ नेते, गावातील जेष्ठ मंडळी, मित्र मंडळी व ज्ञात अज्ञात यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या, फोनव्दारे भेट देवून सांत्वत केले. त्याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोत.

श्री. पंढरीनाथ सिताराम माने | श्री. प्रताप सिताराम माने
माने-पाटील परिवार, व पाहूणे मंडळी विसापूर ता. तासगांव, जि.सांगली

**श्री. पंढरीनाथ सिताराम माने सराफ, सांगली**

**त्वरित पाहिजेत** — PlaNet AGRO INDUSTRIES

**प्लॅनेट ॲग्रो इंडस्ट्रिज**

वार्प निटेड फॅब्रिक व मल्चिंग पेपरच्या अग्रणी उत्पादकांना देशिंग येथील प्लँट मधे खालील जागा त्वरित भरावयाच्या आहेत.

**प्लॅन्ट सुपरवायझर** — टेक्सटाईल अथवा मेकॅनिकल इंजिनिअरींग मधील डिग्री / डिप्लोमा

**स्टोअर किपर** — ग्रॅज्यूएट,
**अकौंटंट** — बी.कॉम, टॅली तसेच GST ज्ञान आवश्यक

सर्व जागांसाठी किमान २ वर्षे अनुभव आवश्यक

इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर किंवा इमेलवर अर्ज पाठवावेत.

फॅक्टरी : गट नं. २७३, मिरज-पंढरपूर रोड, जॉली बोर्डजवळ, देशिंग-४१६४१०
ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली महाराष्ट्र. मोबा. +919307728959, +919822533386
ईमेल - planetagro17@gmail.com वेबसाईट : planetagroind.com

**महत्वाची सूचना : नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांची प्लांटवरती काम करण्याची तयारी असावी. तसे असेल तरच त्यांनी अर्ज करावा.**


**महाराष्ट्र शासन**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पलूस यांचे कार्यालय,**
नवीन प्रशासकीय इमारत, पलूस.
Email Adress:- arcspalus2015@gmail.com
जा.क्र. ३०५ कक्ष-१/नियो. पंचशील महिला ग्रा./नोंदणी/नाहरकत/नोटीस/२०२३.
दिनांक :- १/०८/२०२३.

**नोटीस**

नियोजित श्री. पंचशिला महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या. पलूस, ता. पलूस, जि. सांगली या नियोजित संस्थेच्या नांवे बँकेत खाते उघडणेस परवानगी मिळणे बाबत व संस्था नोंदणी करणेसाठीचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. तरी उपरोक्त नियोजित संस्थेने पलूस गावांपुरते मर्यादित कार्यक्षेत्राची मागणी केली असल्याने पलूस गावांतील सर्व नागरी/ ग्रामीण बिगर शेती पत संस्थांना या नोटीसीव्दारे कळविणेत येते की, नियोजित श्री.पंचशिला महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या. पलूस, ता. पलूस, जि. सांगली या संस्थेस बँक खाते उघडणेस व संस्था नोंदणी करणे बाबत आपल्या संस्थेची कांही हरकत असल्यास ती दिनांक- १७/०८/२०२३ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता आपण वा आपल्या प्रतिनिधी मार्फत लेखी अथवा तोंडी म्हणणे सादर करावे. सदर दिवशी आपण म्हणणे सादर न केलेसं सदर नियोजित संस्थेस बँक खाते उघडणेस व संस्था नोंदणी करणे बाबत कोणत्याही संस्थेची हरकत नाही, असे समजून पुढील योग्य ती कार्यवाही करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पलूस
दिनांक :- ०१/०८/२०२२.

सही/- (विनय शिंदे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, पलूस.



**THE UGAR SUGAR WORKS LIMITED**
Regd. Office : Mahaveernagar (Wakhar Bhag), SANGLI - 416416
CIN: L15421PN1939PLC006738

**NOTICE**

NOTICE is hereby given that, the meeting of the Board of Directors of the Company will be held on **Thursday, the 10th August, 2023 at 03.30 PM** to approve and take on record Un-Audited Financial Results and Segment-wise Revenue Results for the Quarter ended, **30th June, 2023.**

Further in accordance with SEBI (Prohibition of Insider Trading) Regulations, 2015. We have already announced Prohibitions of Trading by Insiders, the Trading Window for dealing in the securities of the Company shall remain Closed for the Directors, Designated Employees and insiders from 1st July, 2023 to till 48 hour after the declaration of financial Result (both days inclusive).

- Sangli
- 02-08-2023

For The Ugar Sugar Works Ltd.
Sd/-
Tushar V Deshpande
Company Secretary

Nupur Ads

**तासगांव नगरपरिषद, तासगांव**

**जाहीर ई निविदा सूचना क्रं. ११ सन२०२३-२४**

मा. मुख्याधिकारी, तासगांव नगरपरिषद, तासगांव जि. सांगली हे वैशिष्ट्यपूर्ण योजना व विशेष रस्ता अनुदान योजनेअंतर्गत विटा नाका ते मार्केट यार्ड गेट पर्यंत ओघळीवर स्लॅब टाकणे व रस्ता काँक्रिटीकरण करणे कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गवारीत नोंदणीकृत व अनुभवी असलेल्या व निविदा सूचना मधील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणारे मक्तेदार यांचेकडून विकास कामे करणेसाठी ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने मागवित आहेत. या कामाची सविस्तर निविदा सुचना ही शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०२/०८/२०२३ ते ०९/०८/२०२३ या कालावधीमध्ये विनामुल्य पाहता तसेच डाऊनलोड करता येईल या निविदेच्या शर्ती व अटी निविदामध्ये नमूद केलेप्रमाणे राहतील. कळावे,

नगरपरिषद कार्यालय, तासगांव
दि. ०१/०८/२०२३
(शिक्का)

सही/- (पृथ्वीराज पाटील)
मुख्याधिकारी, तासगांव नगरपरिषद

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक ९००/२०१९

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग, सांगली
कृष्णाश्रय कॉम्प्लेक्स, महावीरनगर, वखारभाग, सांगली, ता. मिरज, जि. सांगली पिन-४१६ ४१६
**सार्वजनिक न्यासाचे नाव - श्री लक्ष्मी मंदीर देवस्थान ट्रस्ट, पलूस, ता. पलूस, जि. सांगली**
**अर्जदार - श्री. सागर मनोहर मुदगल**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त -२ सांगली विभाग, सांगली हे वर नमूद केलेल्या चौकशी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मालमत्ता : (वर्णन)**

| अ. क्र. | वस्तुचे वर्णन | अंदाजे किंमत | अ. क्र. | वस्तूचे वर्णन | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरतीचे तांब्याचे ताट | ६००/- | २ | दोन पितळी घंटा | ३,०५०/- |
| ३ | तांब्याच्या दोन मोठ्या पणत्या | ५,६००/- | ४ | लहान घंटी | २००/- |
| ५ | तांब्याचा छोटा ग्लास १ नग | २५०/- | ६ | तांब्याचा एक चमचा | १००/- |
| | | | | एकूण | ९,८००/- |

**ब) स्थावर मालमत्ता (वर्णन) - मौजे पलूस ता. पलूस जि. सांगली येथे मिळकत क्र. ४४३६/९४८ मधील ५२५ चौ. फुट जागेतील मंदीर व ४९२० चौ. फुट खुली जागा यांची अंदाजे किंमत रु. १८,६८,२५०/-**

३) संदर्भित विश्वस्त व्यवस्थेबाबत सर्व बाबी या ब-याचशा बाबी माझ्या अखत्यारित आहेत काय ? ४) विश्वस्त व्यवस्थेच्या विश्वस्त व व्यवस्थापकाची नाव व पत्ते काय आहेत? ५) विश्वस्त आणि व्यवस्थापक गेल्यावर विश्वस्त आणि व्यवस्थापक कसे येतात व त्यांची येण्याची रीत काय? ६) विश्वस्त व्यवस्थेचे उद्देश काय आहेत? ७) विश्वस्त व्यवस्थेचे सरासरी ठोक वार्षिक उत्पन्न किती ? ८) विश्वस्त व्यवस्था निर्माण करणाऱ्या दस्तऐवजाचा तपशील काय आहे? २) विश्वस्त व्यवस्था निर्माण करणाऱ्या दस्तऐवजा व्यतिरिक्त विश्वस्त व्यवस्थेच्या निर्मितीबाबत काय दस्तऐवज आहे? १०) विश्वस्त व्यवस्थेच्या उत्पनाची साधने आहेत? ११) विश्वस्त व्यवस्थेसंबंधीच्या मालमत्तेवर तपशिल आहे? १२) विश्वस्त व्यवस्थेची योजना आहे काय ? असल्यास योजनेचा काय तपशिल आहे? १३) विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेच्या मालकी बाबतच्या दस्तऐवजचा तपशिल काय ? आणि ती ज्या अर्जदाराच्या ताब्यात आहे त्यांची नावे आहे काय? (१४) अर्जात दिलेली माहिती खरी व बरोबर आहे काय? १५) सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे नाव काय आहे?

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या **तारखेपासून तीस दिवसांचे आत** या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-२, सांगली विभाग, सांगली यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १९/०७/२०२३ रोजी दिली.

सही/- (विकास तु. ठोंबरे) — निरीक्षक (न्याय)
(कोर्टाचा शिक्का)
सही/- (आर.जी. पाटणकर) — अधिक्षक (न्याय शाखा)
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग, सांगली**